# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** वसमत शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0698 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/12/2024 21:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Date From (दिनांक पासून):** 05/12/2024
**Time Period (कालावधी):**
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/12/2024
**Time From (वेळेपासून):** 14:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/12/2024 **Time (वेळ):** 21:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/12/2024 21:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोस्टेवसमत ग्रामीण चे बीट , अंमलदार यांचे बीट रूममध्ये,वसमत, 431512

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name (नाव):** नागोराव तुकाराम भुजबळे
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974
   (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
   **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुडाळा,वसमत,वसमत ग्रामीण,हिंगोली,महाराष्ट्र,431512,भारत |
| 2 | स्थायी पता | कुडाळा,वसमत,वसमत ग्रामीण,हिंगोली,महाराष्ट्र,431512,भारत |

   (i) **Occupation (व्यवसाय):**
   (j) **Phone number (फोन नं.):**
   **Mobile (मोबाइल नं.):** 91-9763337172

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय दत्तात्रय गोरे | | | 1. गांधीनगर,मारोती मंदीराजवळ, बालाजी जाधव यांचे घरी वसमत,वसमत,वसमत शहर, हिंगोली,महाराष्ट्र,भारत-431512 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रू. (ज्यात 500/ रू. चे 10 नोटा) | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.05.12.2024
मी नागोराव तुकाराम भुजबळे वय 50वर्ष, व्यवसाय शेती, रा.कुडाळा, ता.वसमत, जि.हिंगोली,
मो.क्र.9763337172

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 23.10.2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे श्री प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करून कुटुंबाची उपजिवीका करीत असतो. माझा चुलत मेव्हणा आनंद लक्ष्मण खरे रा.वसमत यांनी माझे व पत्नी सौ.नंदा नागोराव भुजबळे विरूध्दात माहे जुन/2024 मध्ये त्यांचा अपघात घडवुन आणुन त्याला मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे अर्ज केला होता.

सदर अर्जाच्या चौकशी करीता मला व माझ्या पत्नीला पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथील पोलीस हवालदार गोरे यांनी बोलावुन घेवुन सदर प्रकरण आपसात मिटवुन घेतले होते. त्यानंतर मागील दोन तीन दिवसापासुन पोलीस हवालदार संजय गोरे हे त्यांच्या मोबाईल क्रमांक 9923021458 वरून माझ्या मोबाईल क्रमांक 9763337172 वर फोन करून सांगितले की, तुमच्या विरुध्दात आनंद लक्ष्मण खरे रा.वसमत यांने परत तक्रारी अर्ज केलेला आहे, जर तुम्हाला प्रकरण मिटवुन घ्यायचे असेल तर पाच हजार रूपये दयावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करत आहेत.

माझे विरूध्दात केलेल्या तक्रारी अर्ज प्रकरण मिटविण्यासाठी पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथील पोलीस हवालदार गोरे हे मला पाच हजार रूपये मागत असलेले पैसे लाच असल्याचे मला माहित आहे,परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे काम करणार नाहीत म्हणुन मी त्यांना होकार दिला आहे. पोलीस हवालदार गोरे यांना मला लाच देण्याची इच्छा नसुन आमच्यात कोणताही देण्या - घेण्याचा आर्थिक व्यवहार नाही किंवा वैर नाही.

तरी दिनांक 23.10.2024 रोजी पोलीस हवालदार संजय गोरे यांची पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे जावुन भेट घेणार आहे भेटी दरम्यान पोलीस हवालदार संजय गोरे यांनी स्वतः अगर इतरामार्फत लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यानंतर पो.नि.श्री. प्रफुल्ल अंकुशकर ला.प्र.वि हिंगोली यांनी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन माझा परीचय त्यांना व त्यांचा परीचय मला करून दिला, हजर असलेले दोन पंच नामे श्री रमेश पिराजी सुर्यवंशी, उच्चस्तर लिपीक, व श्री दत्ता कुंडलीक रवणे, निम्नस्तर लिपीक, दोन्ही महावितरण उपविभाग, हिंगोली असे असुन त्यांना मी दिलेली लेखी तक्रार दाखविण्यात आली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबधाने दिनांक 23.10.2024 रोजी तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 सुर्यवंशी यांचेसह श्री पोलीस हवालदार संजय गोरे, पोस्टे वसमत ग्रामीण यांची भेट घेण्या करीता पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे गेलो असता पोलीस हवालदार संजय गोरे यांची पोलीस स्टेशन येथे भेट झाली तेव्हा माझा चुलत मेव्हणा आनंद लक्ष्मण खरे यांनी माझे विरुध्द दिलेल्या अर्जा संबधाने बोलणी करत असतांना पोलीस हवालदार संजय गोरे यांनी मला " कस करता मग " असे म्हणले तेव्हा मी त्यांना म्हणालो की,

तुम्ही सांगा की साहेब.. तुम्ही सांगा तस करतो.'' तेव्हा पोलीस हवालदार म्हणाले '' हं मग तुम्हाला समजा ऐच्यात गुन्हा दाखल झाला तरं आवघड जाईल असं म्हणायलो बाकी काय नाही'' त्यावर मी त्यांना म्हणालो '' त्यासाठीच म्हणतो सरं गुन्हा दाखल नका करू गुन्हा दाखल झालं तर पुन्हा अडचन येईल मला '' तेव्हा पोलीस हवालदार गोरे म्हणाले कि, शक्यतोवर मी गुन्हा दाखल करू देणार नाही'' तसेच पोलीस हवालदार गोरे म्हणाले ''मग कसं करता सांगा पटकन बोलायचं '' तेव्हा मी म्हणालो ''तुम्हीच सांगानं साहेब, तुम्ही सांगा मी ऐकायचं वस..'' त्यावर पोलीस हवालदार गोरे म्हणाले ''तुम्हाला मी मांगच म्हटलं होत मी संभाजी पाटलाला ''तेव्हा मी म्हणालो कि, ''संभाजी पाटलांन किती सांगीतलं तेव्हा ''त्यावर पोलीस हवालदार गोरे म्हणाले '' पाच सांगलं होते '' यावर मी म्हणालो '' चार मध्येच मिटवानं सर हजारखांड कमी करा.''तेव्हा पोलीस हवालदार गोरे म्हणाले ''अवं त्यो व्यवहार थोडांच हाय..''यावर मी म्हणालो ''चार हजार राहु द्या सर.... हजार कमी राहु द्या.'' तसेच मी पोलीस हवालदार गोरे यांना म्हणालो ''सर मी मला अर्धा तासाला पैशे आणुन देतो आडत्या पासुन आता'' त्यावर पोलीस हवालदार गोरे म्हणाले '' आता मी चाललो बाहेर मग'' तेव्हा मी म्हणालो ''मग उद्या सकाळी...'' पोलीस हवालदार गोरे म्हणाले ''करा फोन मग..'' असे म्हणुन पोलीस हवालदार गोरे यांनी 5,000/- रू लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दिली होती.

त्यानंतर दिनांक 23.10.24 रोजी पो.नि. श्री. प्रफुल्ल अंकुशकर ला.प्र.वि हिंगोली यांनी वसमत येथील गुरूव्दारा समोरील मोकळया परीसरात शासकिय वाहनामध्ये सापळा पुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करून दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 5,000/- रू. (ज्यात 500/- रू. चे 10 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी अँन्थ्राँसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक चापोह अकबर लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्राँसीन पावडर लावली व पोलीस हवालदार गोरे यांनी लाच स्विकारल्या नंतर त्यांचे गळयातील मोठा पांढरा रूमाल काढुन हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी मला, पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिली. मी सदरची रक्कम घेवुन पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे गेलो असता तेथे पोलीस हवालदार गोरे व माझी भेट झाली नाही ते बाहेर कुठेतरी अपघात झाला म्हणुन तेथे निघुन गेले होते.

त्यानंतर दिनांक 24.10.2024 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालयातील सापळा पथकासमोर परत पोलीस हवालदार गोरे यांना फोन केला असता त्यांनी मला, मी सध्या बाहेर आहे, कामामध्ये आहे, नंतर कॉल करतो असे म्हणाले असता मी त्या दिवशी त्यांचे फोनची दिवसभर वाट पाहिली, त्यांना ब-याच वेळेस फोनसुध्दा केला परंतु त्यांचा फोन लागला नाही म्हणुन मी घरी गांवाकडे निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक 25.10.2024 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालयातील सापळा पथकासमोर परत पोलीस हवालदार गोरे यांना दुपारी फोन केला असता त्यांनी मी आता बंदोबस्त मध्ये आहे. मी फोन केल्याशिवाय येवु नका. असे म्हणाल्याने मी त्यांचे फोनची आज पर्यत वाट पाहिली. परंतु त्यांनी मला परत फोन केला नाही.

त्यानंतर आज दिनांक 05.12.2024 रोजी मी व सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच यांनी सर्वानुमते पोलीस हवालदार गोरे यांची भेट घेण्याचे ठरविले. त्यावरून पो.नि. श्री. प्रफुल्ल अंकुशकर ला.प्र.वि हिंगोली यांनी वसमत येथील गुरूव्दारा समोरील मोकळया परीसरात शासकिय वाहनामध्ये सापळा पुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करून दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 5,000/- रू. (ज्यात 500/- रू. चे 10 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी अँन्थ्राँसीन पावडर व अँल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक चापोह अकबर लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्राँसीन पावडर लावली व पोलीस हवालदार गोरे यांनी लाच स्विकारल्या नंतर माझ्या गळयातील मोठा पांढरा रूमाल काढुन हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी मला पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिली.

त्यानंतर दिनांक 05.12.2024 चे दुपारी 14.24 वा. दरम्यान मी व सोबत पंच क्रमांक 1, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे पोलीस हवालदार गोरे, यांना भेटण्यासाठी पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे गेलो तेव्हा पोलीस हवालदार गोरे हे पोलीस स्टेशनला हजर नसल्याने माझे मोबाईल क्रमांक 9763337172 वरून पोलीस हवालदार गोरे यांचे मोबाईल क्रमांक 7083110487 वर फोन केला, तेव्हा गोरे हे मला म्हणाले कि, मी बाहेर आलो आहे, थांबा पाच मिनीटात येतो असे म्हणाले म्हणुन मी पोलीस स्टेशनला थांबुन राहिलो, नंतर थोडया वेळाने पोलीस हवालदार गोरे हे पोलीस स्टेशनला आले तेव्हा माझी पोलीस हवालदार गोरे यांचेशी भेट झाली व मी माझे विरूध्द दिलेल्या अर्जासबंधाने बोलणे सुरू असतांना हवालदार गोरे यांनी पडताळणी दरम्याण मागणी केलेली लाच रक्कम 5,000/- रू त्यांना देवुन म्हणालो की, '' पाच हजार हायतं मापुन घ्या मातर दुमार केस होवु नये बरं का,

केस करू नका '' तेव्हा पोलीस हवालदार गोरे म्हणाले की, आमच्या परीनं तुम्हाला एकशे एक टक्का..... नाही मी करूच नाही देत केस असे म्हणुन त्यांनी मी आणलेली 5,000/- रू लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे अंगातील शर्टाचे डावे बाजुच्या खिशात ठेवली, तेव्हा मी पोलीस स्टेशनच्या बिट रूमच्या बाहेर येवुन सापळा पथकास ठरल्या प्रमाणे लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने पोलीस हवालदार गोरे यांना अंदाजे दुपारी 16.09 वा. पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथील बिट रूममध्ये त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे अंगातील शर्टाचे डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 5,000/-रू. त्याचेकडून पंचासमक्ष जप्त केली. तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार संजय गोरे यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान व फोनवर झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी पोलीस हवालदार गोरे, पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण यांनी माझे विरूध्दात आनंद लक्ष्मण खरे रा.वसमत यांने केलेले तक्रारी अर्ज प्रकरण मिटवुन घेण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी पाच हजार रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम 5,000/- रू आज रोजी स्वतः स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे आज दिनांक 05.12.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांना तोंडी सांगितली असून ती संगणकावर टंकलिखित केली फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही -

नागोराव तुकाराम भुजबळे,
रा.कुडाळा,ता.

( प्रफुल्ल हं. अंकुशकर)
पोलीस निरीक्षक,
वसमत,जि.हिंगोली
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली .

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
PRAFULL HANUMANTRAO ANKUSHKAR
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन ...... (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** KUNDANKUMAR BAF
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN72855